**आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना किरकोळ खर्च व अन्य अनुज्ञेय बाबींवरील खर्च भागविण्यासाठी सादिल अनुदान मंजूर व वितरीत करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-सादिल-२०२२/प्र.क्र.११४/एसएम-४,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:-०६ जुलै, २०२२

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. पीआई-१०९४/७०४(दोन)/प्राशि-१, दिनांक १४ नोव्हेंबर, १९९४.
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.उमाशा-२०२०/प्र.क्र.१३/ एसएम-४, दिनांक ०४ जून, २०२०.
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.उमाशा-२०२०/प्र.क्र.१३/ एसएम-४, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१
(४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दिनांक ०४ एप्रिल, २०२२

**<u>प्रस्तावना:-</u>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळासाठी भौतिक, शैक्षणिक सुविधा व दैनंदिन उपयोगाचे साहित्य उपलब्ध करण्यासाठी मागील वर्षाच्या वेतन खर्चाच्या ४ टक्केपर्यंत सादिलवार खर्च करण्यास संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सादिलवार खर्च करावयाच्या अनुज्ञेय बाबींच्या यादीमध्ये संदर्भ क्र.(२) व (३) येथील शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे.

२. राज्यात कोविडचा प्रादुर्भाव कमी झाल्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा दि.१५.०६.२०२२ पासून व विदर्भात दि.२७.०६.२०२२ पासून सुरु करण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र.(४) येथील परिपत्रकास अनुसरुन, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना अनुज्ञेय विविध बाबींवरील किरकोळ खर्च भागविण्यासाठी तसेच, शाळांनी भाड्याने घेतलेल्या खाजगी इमारतीचे भाडे अदा करण्यासाठी आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता सादिल अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांच्या किरकोळ खर्चासाठी, अनुदान निर्धारण पूर्ण झालेल्या जिल्ह्यासाठी तसेच, जिल्हा परिषदांनी प्राथमिक शाळांसाठी भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी इमारतीच्या जागेचे थकित भाडे अदा करण्यासाठी संदर्भ

क्र. (२) व (३) येथील शासन निर्णय, अनुक्रमे दि.०४.०६.२०२० व दि. २९.११.२०२१ मधील सुधारीत तरतूदीनुसार रु.१०३८.३० लक्ष ( रुपये दहा कोटी अडतीस लक्ष तीस हजार फक्त ) इतका निधी संबंधितांना मंजूर व अदा करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सुपूर्द करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्ची टाकण्यात यावा. तसेच, सदर निधी वितरीत करण्यापूर्वी संबंधितांकडून वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करावीत. शक्यतो यापूर्वी दिलेल्या अनुदानाचा विनियोग पूर्ण झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये. कोषागार अधिकाऱ्यांनी सहायक अनुदानामधून निधी आहरित करण्यासाठी सादर केलेल्या देयकासोबत संस्थेचे लगतच्या मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंटची प्रत जोडलेली नसल्यास देयक पारीत करु नये.

३. उपरोक्त बाबीवर होणारा खर्च “मागणी क्र. ई-२, २२०२- सर्वसाधारण शिक्षण-०१-प्राथमिक शिक्षण १९६, जिल्हा परिषदांना सहाय्य (०१) प्राथमिक शिक्षणासाठी जिल्हा परिषदांना सहाय्य (०१)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२२०२-०१७३) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली चालू आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६६४/व्यय-५, दि.२८.०६.२०२२ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०७०६१७५०१२०५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sameer Anant Sawant
Date: 2022.07.06 17:52:35 +05'30'

**( समीर सावंत )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,,
६) सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

७) जिल्हाधिकारी, सर्व
८) आयुक्त (शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. (सर्व)
१०) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
११) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई/पुणे/नाशिक/कोल्हापूर/औरंगाबाद/लातूर/अमरावती व नागपूर विभाग
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३) महालेखापाल (लेखापरिक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व
१५) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
१६) शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने
१७) निवड नस्ती, एसएम-४.